**नियमित दिवाणी दावा ४९/२०२० निशाणी ५ खालील आदेशः–**

विश्वनाथ दत्तात्रेय म्हसे ....वादी

वि.

दत्तात्रेय वामन पाटील व इतर .... प्रतीवादी

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतीवादींविरुध्द तात्पुरत्या स्वरुपाच्या मनाई हूकुम मिळणेकरीता दाखल केला आहे वादीचे थोडक्यात कथन असे की, दावा मिळकत सव्हे नं जुना २७/१ +३ अ / २ व नवा २७/१/ब ही वादीच्या कुटुंबाचे मुळ पुरुष दत्तात्रेय पांडूरंग म्हसे यांच्या स्वतंत्र मालकी हक्कातील व ताबेकब्जातील होती. त्यांना वारस मुलगे वादी स्वतः तसेच कुंडलिक दत्तात्रेय म्हसे, विजय दत्तात्रेय म्हसे, अशोक दत्तात्रेय म्हसे व मनोहर दत्तात्रेय म्हसे असुन वारस मुली हिराबाई भास्कर मोरे व यशोदा यशवंत पवार आहेत. प्रतीवादी क्र ३/१ ते ३/३ यांचे वडील प्रदिप दत्तात्रेय म्हसे हे दत्तात्रेय पांडूरंग म्हसे यांचे वारस नाही व त्यांचेशी कोणताही संबंध नाही. दावा मिळकतीस सन १९५५ साली दत्तात्रेय पांडूरंग म्हसे यांचे नाव फेरफार क्र ८७५ प्रमाणे करण्यात आली. तेव्हा पासून सदर मिळकत वादीच्या व त्यांच्या कुटुंबाच्या मालकीहक्क ताबेकब्जा वहीवाटीत आहे. परंतु दावामिळकतीचे सदर दावा दाखल करण्ययापूर्वी ७/१२ उतारे काढले असता त्यावर दत्तात्रेय पांडूरंग म्हसे याच्या ऐवजी श्री.दत्तात्रेय वामन पाटील अशा नावाची नोंद झाल्याचे वादीस समजले म्हणुन त्याबाबत करण्यात आलेले सर्व फेरफार उतारे वादीने मिळविले असता फेरफार नोंद क्र १८६४ प्रमाणे दावामिळकतीच्या सदरी प्रतीवादी क्र ३/१ ते ३/३ यांचे वडील प्रदिप

दत्तात्रेयय म्हसे यांचे नाव दाखल करण्यात आले तसेच प्रतीवादी क्र २/१ चे वडील यांचे नाव फेरफार क्र २३०७ प्रमाणे व त्यानंतर प्रतीवादी क्र १ चे नाव फेरफार क्र २६३० प्रमाणे खरेदीखताच्या नोंदी अन्वये लागल्याचे निदर्शनास आले. वास्तविक प्रतीवादी क्र ३/१ ते ३/३ यांचे वडीलांनी दत्तात्रेय पांडूरंग म्हसे यांच्याशी कोणताही संबंध नसतांना केवळ नाव सार्धम्याचा फायदा घेवून दावा मिळकतीस नाव लावून घेतले व ते बेकायदेशीर आहे.

२. प्रतीवादी क्र ३/१ ते ३/३ यांचे वडील प्रदीप दत्तात्रेय म्हसे हे दिनांक २७/०७/२०१३ रोजी मयत झाले असुन त्यांच्या मृत्यू दाखल्यावर त्यांचे आईचे नाव श्रीमती अनुसया दत्तात्रेय म्हसे व वडीलांचे नाव दत्तात्रेय दगडू म्हसे असे लिहण्यात आले आहे यावरुन प्रदिप दत्तात्रेय म्हसे हे वादीच्या वडीलांचा मुलगा नाही असे दिसते. सदर करण्यात आलेली फेरफार नोंद ही पूर्णपणे चुकीची असुन दावामिळकतीमध्ये प्रतीवादी क्र ३/१ ते ३/३ यांना कोणताही अधिकार प्राप्त होत नाही. त्याअनुषंगाने प्रतीवादी क्र २/१ चे वडील व प्रतीवादी क्र १ यांचे सोबत करण्यात आलेले खरेदीखत देखील बेकायदेशीर आहे. म्हणुन वादीने सदर अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतीवादी क्र १ व २ ने निशाणी २२ व २६ वर जबाब देवून वादीची कथने नाकारली आहेत. त्याचप्रमाणे प्रतीवादी क्र ३/१ ते ३/३ यांनी देखील निशाणी २४ वर जबाब देवून वादीची कथने नाकारली आहेत. या सर्व

प्रतीवादींनी सर्वसाधारणपणे सारखीच कथने केली असुन त्यांचे असे म्हणणे की प्रतीवादी क्र ३/१ ते ३/३ चे वडीलांच्या नावे १९८३ मध्ये वाटप पत्राअन्वये दावामिळकत देण्यात आली. तेव्हापासून १९९६ पर्यंत सदर दावामिळकत प्रदिप दत्तात्रेय म्हसे हे उघडपणे विनाहरकत मालकी हक्काने स्वतः कसत होते त्यांनी प्रतीवादी क्र २/१ चे वडील मयत श्री.चेतन शिवाजी शहा यांना सदर दावमिळकत दि.१५/१०/१९९६ रोजी नोंदणीकृत खरेदीखताने विक्री केली. त्यानंतर प्रतीवादी क्र २/१ चे वडीलांनी प्रतीवादी क्र १ यांना सदर दावामिळकत दि.०१/११/२००६ रोजी नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी दिली व तेव्हा पासून प्रतीवादी क्र १ हे सदर दावामिळकतीचे पूर्ण मालक व कब्जेवहीवाटदार झाले. प्रतीवादी क्र २/१ च्या वडीलांना २००६ पर्यंत त्यांच्या दावामिळकतीवरील ताबेकब्जास कोणीही कधीही हरकत घेतली नाही. त्याचप्रमाणे वादी यांचे वडील श्री. दत्तात्रेय पांडूरंग म्हसे यांनी दाविामळकत वाटप पत्राने मयत श्री प्रदिप दत्तात्रेय म्हसे यांना दिल्याची नोंद फेरफार क्र १८६४ प्रमाणे करण्यात आली असल्याने वादीचे दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही व वादीचा दावामिळकतीशी कोणताही हक्क व हितसंबंध नव्हता व नाही. असे कथन करुन प्रतीवादींनी सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

४. दिवाणी संहिता कलम ऑर्डर ३९ नियम १ अन्वये तात्पुरत्या मनाई हुकूम देणेकरीता वादीला प्रथमदर्शनी केस, न्यायीक समतोल व कधीही न भरुन येणारे नुकसान या तीन महत्वाच्या बाबी प्रथमदर्शनी सिध्द कराव्या लागतात.

त्याकरीता सर्वांत प्रथम दावामिळकतीचा ताबा वादीकडे असल्याचे देखील प्रथमदर्शनी सिध्द होणे आवश्यक असते. वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांपैकी दावामिळकतीच्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता त्यावर प्रतीवादी क्र १ दत्तात्रेय वामन पाटील यांचे नाव लागल्याचे प्रथमदर्शनी दिसते. तसेच फेरफार क्र ८७५ च्या प्रमाणीत प्रतीवरुन वादीचे मुळ पुरुष दत्तात्रेय पांडूरंग म्हसे यांच्या नावे मिळकत जुना सवहे क्र २७/१+३ अ दिल्याचे प्रथमदर्शनी १९५७ साली दिसते. परंतु वादीने दाखल केलेल्या फेरफार क्र १८६४ च्या प्रमाणित प्रतीचे अवलोकन केले असता असे प्रथमदर्शनी लक्षात येते की, दि.१४/०३/१९८३ रोजी श्री.दत्तात्रेय पांडूरंग म्हसे यांनी लेखी वर्दी देवून त्यांच्या मिळकतींचे वाटप झाल्याची नोंद झाली असुन त्यामध्ये जुना सव्हे नंबर १२७/१+३/अ /१ व १२७/१+३/अ/२ असे दोन भाग झाल्याचे प्रथमदर्शनी दिसते व त्यातील १२७/१+३/अ/२ ही दावामिळकत श्री.प्रदिप दत्तात्रेय म्हसे याच्या नावे प्रत्यक्ष वहीवाट व ताबेकब्जात दिल्याचे देखील प्रथमदर्शनी समजते. सदर फेरफार उता–यामध्ये वादीच्या नावे इतर मिळकती दिल्याचे देखील प्रथमदर्शनी दिसून येते. त्यानंतर फेरफार क्र २३०७ व २६३० यांचे अवलोकन केले असता त्यावरुन दावामिळकत अनुक्रमे श्री.चेतन शिवाजी शहा व त्यांनतर दत्तात्रेय वामन पाटील यांच्या नावे खरेदीखत झाल्याची नोंद केल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. या सर्व कागदपत्रांवरुन दावामिळकत वादीच्या व त्याच्या कुटुंबाच्या ताबेकब्जा वहीवाटीत असल्याचे प्रथमदर्शनी सद्यस्थितीत सिध्द होत नाही. त्यामुळे वादी प्रथमदर्शनी केस सिध्द करण्यास अयशस्वी ठरला आहे. परिणामी न्यायाचा समतोल देखील

वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी प्रस्थापित झालेला नाही. सबब सदर फेरफार नोंदी या कायदेशीर आहेत अथवा बेकायदेशीर हे पुढे पुराव्यानिशी सिध्द करण्याची संधी दोन्ही पक्षकारांना उपलब्ध आहे परंतु सदर तात्पुरत्या स्वरुपाचा मनाई हुकूम नाकारल्यास वादीचे सद्यपरिस्थित कोणतेही न भरुन येणारे नुकसान होणार नाही असेच माझे समोरील अभिलेखावरुन प्रथमदर्शनी दिसते. करीता आदेशः–

**आदेश**

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

PRAJKTA S APTE

Digitally signed by PRAJKTA S APTE
Date: 2023.11.28 11:11:05 +0530

कर्जत (पी.एस.आपटे )

दिनांकः २७/११/२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर कर्जत

जिल्हा–रायगड.